# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्र.** 238/2017

विषय : स्वायत्त महाविद्यालये व स्वायत्त परिसंस्थांमधील शिक्षकांच्या निवड प्रक्रियेसंदर्भात...

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये स्वायत्त महाविद्यालये व स्वायत्त परिसंस्थांसंदर्भातील कलम १२२ (३) व (४) खालीलप्रमाणे आहे :

(३) स्वायत्त विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था किंवा संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, परिनियमांमध्ये विहित करण्यात येईल त्याप्रमाणे त्याची प्राधिकरणे किंवा मंडळे घटित करू शकेल आणि अधिकारांचा वापर करू शकेल व कार्ये पार पाडू शकेल व विद्यापीठाचे प्रशासकीय, विद्याविषयक आणि इतर कार्यक्रम पार पाडू शकेल.

(४) स्वायत्त विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था किंवा संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, परिनियमांमध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर, स्वतःचे अभ्यास पाठ्यक्रम विहित करू शकेल, स्वतःच्या अध्यापन पद्धती विकसित करू शकेल आणि तिथे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा व चाचणी परीक्षा घेऊ शकेल आणि पदव्या, पदविका किंवा प्रमाणपत्रे देण्याची विद्यापीठाला शिफारस करू शकेल. स्वायत्त विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था किंवा संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांना या अधिनियमाच्या तरतुदी व परिनियम आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे यांच्या अधीन राहून, पूर्ण विद्याविषयक व प्रशासकीय स्वायत्तता असेल.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वायत्त महाविद्यालये / स्वायत्त परिसंस्थासंदर्भातील १२व्या पंचवार्षिक योजनेसाठी सन २०१२ ते सन २०१७ करिता निर्गमित केलेल्या नियमावलीमधील मुद्दा क्र. १४ खालीलप्रमाणे आहे :

''All recruitments of teaching staff will be made by the Governing Body/state government in accordance with the policies laid down by the UGC and state government''.

तसेच स्वायत्ततेसंदर्भातील विद्यापीठाचा परिनियम क्र. ६४२ हा खालीलप्रमाणे आहे :

"The recruitment of the teaching faculty and their qualifications, reservation rules and service conditions of the teaching faculty shall be as per the Statutes prepared by the University, from time to time".

उपरोक्त नियमांचे अवलोकन करून प्राप्त झालेल्या आदेशानुसार कळविण्यात येते की, स्वायत्त महाविद्यालये / स्वायत्त परिसंस्थांमधील शिक्षकांच्या नेमणुका संबंधित स्वायत्त महाविद्यालये / स्वायत्त परिसंस्थांचे व्यवस्थापन मंडळ हे करू शकतात. तथापि, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच आरक्षणासंदर्भातील वेळोवेळी लागू झालेल्या नियमांचे पालन करून स्वायत्त महाविद्यालये / स्वायत्त परिसंस्था यांचेकडून शिक्षक निवड प्रक्रिया राबविण्यात यावी.

तसेच स्वायत्त महाविद्यालये / स्वायत्त परिसंस्थांनी नियुक्त केलेल्या उमेदवारांची शिक्षक मान्यता घेण्यासंदर्भात या विभागाचे पत्र क्र. सीसीओ/१०१९, दि. ७ जून, २०१७ नुसार कार्यवाही करावी.

गणेशखिंड, पुणे-४११००७ )
जा.क्र. सि.सि.ओ/2401/२०१७ )
दिनांक : 29 नोव्हेंबर, २०१७ )

20/11/17

उपकुलसचिव
( शैक्षणिक विभाग )

प्रति :
१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था.
२) उपकुलसचिव, आरक्षण कक्ष, सा. फु. पुणे विद्यापीठ, पुणे-७.